13-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/12/2025 11:23 PM Page 1



# छायाचित्रण क्षेत्रातून विद्यार्थ्यांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध

## प्राचार्य नामदेव गावस यांचे प्रतिपादन साखळीत छायाचित्रण अभ्यासक्रमाचा समारोप

*टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १२ :** सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा काळ आहे. नव्या शैक्षणिक धोरणात कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आहे. छायाचित्रण अभ्यासक्रमातून छायाचित्रणासंदर्भात अनेक कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसाद केली असल्यामुळे या व्यवसायात ते उज्ज्वल यश मिळवू शकतात. कारण छायाचित्रण क्षेत्रातून विद्यार्थ्यांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होऊ शकते, असे प्रतिपादन प्राचार्य नामदेव गावस यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागाने आयोजित केलेल्या छायाचित्रण अल्पकालीन



**साखळी : प्रणव मोरजकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करताना प्राचार्य नामदेव गावस. सोबत वाणिज्य विभाग प्रमुख प्रशांत भोसले व प्रा.प्रियांका ठाणेकर**

अभ्यासक्रमाच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मुख्य मार्गदर्शक प्रणव मोरजकर, वाणिज्य विभाग प्रमुख प्रशांत भोसले, प्रा.प्रियांका ठाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अभ्यासक्रम अहवालाचे वाचन प्रा. प्रियांका ठाणेकर यांनी केले. यश केळकर आणि अंकिता तिळवे यांनी अभ्यासक्रमाबद्दल आपला अभिप्राय दिला. परिजा शेख आणि वेदिका गड केरकर यांनी समारोप सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. तर आभार वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. प्रशांत भोसले यांनी मानले. या अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली वाणिज्य शाखेच्या सहाय्यक प्राध्यापिका प्रियांका ठाणेकर यांनी केले.

टा अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना छायाचित्रणातील मूलभूत ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्यांनी सुसज्ज करणे, उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा काढण्यासाठी विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविणे छायाचित्रणाच्या आवश्यक तत्त्वांची ओळख करून देणे हा होता. व्यावहारिक सत्रांमुळे विद्यार्थ्यांना कॅमेरा आणि संबंधित उपकरणासह प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. इनडोअर आणि आउटडोअर दोन्ही शूट घेण्यात आले. ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रकाश परिस्थिती आणि वातावरणाची ओळख झाली. महाविद्यालयीन परिसरातील विविध ठिकाणांचा सर्जनशीलपणे वापर यावेळी करण्यात आला.

**प्रणव मोरजकर यांचे मार्गदर्शन**

विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीची मूलभूत तत्त्वे, लेन्सचे प्रकार आणि कॅमेरा सेटिंग्ज (आयएसवो, शटर स्पीड, अपर्चर) प्रकाश तंत्रे, फ्रेमिंग आणि विषय फोकस, पोर्ट्रेट लँडस्केप, स्ट्रीट आणि इव्हेंट फोटोग्राफी इत्यादी विविध प्रकारच्या फोटोग्राफी आणि फोटो एडिटिंग साधने वापरून ायाचित्रणासंदर्भातील आवश्यक बाबींची ओळख विद्यार्थ्यांना मुख्य मार्गदर्शक प्रणव मोरजकर यांनी करून दिली.

# 'दयानंद'चे लाभार्थी वर्षभरापासून प्रतीक्षेत

*टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १२ :** समाजकल्याण खात्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेचे अनेक लाभार्थी मागील वर्षभरापासून केवळ अर्ध्या मानधनावर समाधान मानत आहेत. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा २,००० रुपये मिळणे अपेक्षित असताना, सध्या फक्त समाजकल्याण खात्याच्यावतीने ९७५ रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत. एलआयसीकडून देण्यात येणारे उर्वरित १,०२५ रुपये मे २०२४ पासून येणे बंद झाले आहे.

या संदर्भात लाभार्थ्यांनी समाजकल्याण खात्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, समाधानकारक उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. खात्याच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क केल्यावर सध्या सर्वेक्षण सुरू आहे, त्यामुळे अर्धे पैसे येण्यास विलंब होत आहे, असे उत्तर अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. मात्र अर्धे मानधन देण्यासाठी सरकारला कसला अडखळा निर्माण होता आहे, असा प्रश्न लाभार्थिंनी केला आहे.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या तक्रार निवारण क्रमांकावर तक्रार नोंदवली असता, त्यावरून देखील ठोस प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येते. मुख्यमंत्री कार्यालयामार्फत समाजकल्याण खात्याकडे तक्रार पाठवण्यात येते आणि त्यावरून लाभार्थ्यांचे मानधन बँक खात्यात जमा करण्यात आले आहे, असे उत्तर दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या खात्यात संबंधित रक्कम जमा झालेली नाही.

६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक सहाय्य देण्याच्या हेतूने सरकारने ही योजना सुरू केली होती. तथापि, प्रत्यक्षात लाभार्थ्यांना या योजनेचा संपूर्ण लाभ मिळत नाही.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संपूर्ण गोव्यातील ३,५०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना मागील वर्षभरापासून दरमहा फक्त ९७५ रुपयेच मिळत आहेत, तर उर्वरित १,०२५ रुपये प्रलंबित आहेत. यासंदर्भात समाजकल्याण खात्याचे संचालक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून देखील कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.



**कुडणे : गौरविण्यात आलेल्या कुडणे येथील महालक्ष्मी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसोबत ज्ञानेश्वर मळीक, दामोदर मळीक व इतर.**

# कुडणे येथील महालक्ष्मी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा गौरव

*टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १२ :** कुडणे येथील महालक्ष्मी हायस्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागल्याने यशस्वी विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. विद्यालयातून ४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यातील ११ विद्यार्थी विशेष श्रेणीत, १७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

आकांक्षा गुणाजी ही विद्यार्थिनी ९०.३३ टक्के मिळवून विद्यालयात प्रथम स्थान, सोहम विष्णु धवळे याने ९० टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान तर कु.सर्वेश सतीश गावस याने ८९.१६ टक्के गुण मिळवून तृतीय स्थान प्राप्त केले. यावर्षी

विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्याप्रसंगी महालक्ष्मी हायस्कूलच्या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मळीक, व्यवस्थापक दामोदर मळीक,सचिव गौरेश मळीक व अन्य पदाधिकारी यसो मळीक, मधू मळीक,अर्जुन मळीक, गुरुदास मळीक, विद्यालयाचे मुख्याध्यापक नीलेश गुणाजी, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुरेश मळीक, उपाध्यक्ष कृष्णा मळीक व अन्य पदाधिकारी तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक नीलेश गुणाजी यांनी केले.



**साखळी : प्रमुख पाहुणे छायाचित्रकार आणि शिक्षक प्रणव मोरजकर यांच्यासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामेदव गावस, वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा.प्रशांत भोसले, प्राध्यापक वर्ग, सहभागी विद्यार्थी.**

# विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि ज्ञानात्मक गुणांचा विकास

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी सरकारी महाविद्यालयात वाणिज्य सप्ताह उत्साहात**

साखळी, दि. १२ : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागाने महाविद्यालयाच्या परिसरात वाणिज्य सप्ताह उत्सव टूकेटूाईव्ह आयोजित केलेला होता. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता अधोरेखित करण्यासाठी नाविन्यपूर्ण कार्यक्रमांची मालिका यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धा (विकसित भारत २०४७ : १० ट्रिलीयन डॉलर्स इकॉनॉमी व्हिजन) वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, आउट ऑफ वेस्ट स्पर्धा, रील मेकिंग स्पर्धा यांचा समावेश होता. टॅलेंट शो, स्टार्टअपपिडिया, रांगोळी विदाउट कलर्स अंतर्गत आयपीएल मॉक ऑक्शन यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांनी या वाणिज्य सप्ताह उत्सव टूकेटूाईव्हमध्ये रंगत आणली. डॉ. रमाशांती नाईक, प्रा.शीतल मांद्रेकर, प्रा.प्रगती केरकर आणि स्नेहा गावकर, प्रा.प्रशांत भोसले, प्रा.कॉनरॉड डिसोझा, प्रा. साईश नाईक, प्रा.मंदा परब, प्रा.यक्षिता वेंगुर्लेकर, प्रा.नवमी सावंत, प्रा.प्रियांका ठाणेकर, प्रा.कलाश्री लोटलीकर, प्रा.प्रीतम नाईक यांनी या स्पर्धांच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. याचदरम्यान महाविद्यालयाच्या सभागृहात वाणिज्य सप्ताह उत्सव टूकेटूाईव्हच्या समारोप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यावसायिक छायाचित्रकार आणि शिक्षक प्रणव मोरजकर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राचार्य नामदेव गावस यांनी करून दिली व उपस्थितांचे स्वागत केले. प्रा.यक्षिता वेंगुर्लेकर यांनी वाणिज्य सप्ताह टूकेटूाईव्ह उत्सवाचा सविस्तर अहवाल वाचला.

**मान्यवरांच्याहस्ते विद्यार्थ्यांचा गौरव**

यावेळी विविध स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्याहस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक वितरित करण्यात आले. पारिका शेख आणि वेदिका गड केरकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा.प्रशांत भोसले यांनी मानले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला होता.

# सावईकर हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के


**वळवई : सावईवेरे येथील के. आर. एस. एस. हायस्कूलचा १०० टक्के निकाल लागलेले यशस्वी विद्यार्थ्यांसोबत मुख्याध्यापिका परपेचुआ फर्नांडिस व शिक्षक वर्ग.**

*टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १२ :** वळवई – सावईवेरे येथील कृष्णा रघुनाथ शेट्ये सावईकर हायस्कूलचा यंदा दहावीच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. त्यामुळे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका परपेचुआ फर्नांडिस तसेच सर्व शिक्षकांचे कौतुक होत आहे.

यंदा या विद्यालयाचे एकूण ४१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी विशेष श्रेणीत १२, प्रथम श्रेणीत १४, द्वितीय श्रेणीत १४ व पास श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उर्वी विनायक शेट हिने ८७.८३ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. आर्यन संदीप नाईक याने ८६.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, सुर्वी ज्ञानेश्वर नाईक ही ८५.१७ टक्के गुण मिळवून तृतीय, आर्या तुळशीदास नाईक हिने ८३.५० टक्के गुण मिळवून चौथा तर प्रिया प्रेमचंद गुप्ता हिने ८३.३३ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला आहे.या यशाबद्दल गोवा विद्याप्रसारक मंडळाच्या व्यवस्थापन समितीने मुख्याध्यापिका परपेचुआ फर्नांडिस, शिक्षक वर्ग तसेच सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

पान १ वरून

## अटकेची कारणे दिली नसल्याने तिघांची सुटका

पोलिसांनी मांडला. मात्र, न्यायालयाचे अध्यक्ष साई प्रभुदेसाई यांनी निरीक्षण नोंदवताना स्पष्ट केले की, एका आरोपीच्या वडिलांना अटकेबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती, आणि जी माहिती दिली गेली ती त्यांना समजणाऱ्या भाषेत नव्हती. तपास अधिकाऱ्यांनी आरोपींच्या कुटुंबीयांना किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस अटकेची अधिकृत माहिती न दिल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे अटक ही कायदेशीर चौकटीबाहेर असल्याचा ठपका ठेवत, न्यायालयाने तिन्ही आरोपींना तत्काळ मुक्त करण्याचे आदेश दिले.

## ट्रम्प यांची थोडीसी मेहरबानी

प्रमुख कारणे आहेत. फक्त टॅरिफ वाढीच्या आधारावर उत्पादन चीनमधून अमेरिकेत हलवले जाईल, ही अपेक्षा वास्तववादी नाही, असे विश्लेषकांचे मत आहे. उत्पादन खर्चात वाढ, नव्या जागी साखळी उभारण्यासाठी लागणारा वेळ आणि संसाधनांची मर्यादा या सर्व गोष्टी लक्षात घेता, उद्योग क्षेत्रात त्वरित बदल होणे शक्य नाही, असे त्यांचे मत आहे.

## गोव्यात न्यायाधीशांची कमतरता; प्रकरणे प्रलंबित

जिल्हा आणि अधीनस्थ न्यायालयांमध्ये सुमारे ६०,००० प्रकरणे प्रलंबित असून, उच्च न्यायालयाच्या खटल्यांसह ही संख्या ६५,८३७ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या १५% पेक्षा जास्त प्रकरणे दशकभराहून अधिक कालावधीपासून निकालाच्या प्रतीक्षेत आहेत, जे राज्याच्या न्यायव्यवस्थेची गंभीर अवस्था अधोरेखित करते.

# चिकाटीने अभ्यास केल्यास निश्चित यश

टीम दैनिक हेराल्ड

**दिनार म्हार्दोळकर : अंबिये महाविद्यालयात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळा उत्साहात**

विर्नोडा, दि. १२ : विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चितपणे प्राप्त होते, असे प्रतिपादन दिनार म्हार्दोळकर यांनी केले. ते संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयात आयोजित केलेल्या ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर उपस्थित होते. संत सोहिरोबानाथ अंबिये शासकीय कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा–पेडणे येथे २८ मार्च २०२५ रोजी महाविद्यालययातील परिसंवाद सभागृहात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती वितरण समारंभ यशस्वीरित्या पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक उत्कृष्टता आणि समर्पणाची दखल घेत विविध वर्गातील १८ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिष्यवृत्ती समितीचे संयोजक प्रा. आनंद कोळंबकर यांनी शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे संयोजन केले.

महाविद्यालय सर्व शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करते आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रयत्नांमध्ये सतत यश मिळावे अशी प्रार्थना करतो, असे असे प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध राहण्यासाठी प्रोत्साहित केले.

# होंडा हायस्कुलचा निकाल १०० टक्के

*टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १२ :** होंडा हायस्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयातून २५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यातील ३ विद्यार्थी विशेष श्रेणीत,१३ प्रथम श्रेणीत व ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

कृतिका म्हापसेकर हिने ८४ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान प्राप्त केला. रिया देसाई हिने ७७ टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान तर विधिता होंडकर हिने ७६ टक्के गुण मिळवून तृतीय स्थान प्राप्त केले. ऋतुजा पवार, सिद्धी देसाई, निहारिका साळुंखे, धृवी गावडे, रोहित मुळास, साईश गावस, रोहन होंडकर, सरस्वती यिचांगी, उर्वी वळवईकर, दिवेश सोलयेकर, युवराज राणे, अंशिका शेळकर व वंश खोर्जुवेकर यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली.

# दुर्गा इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के

*टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १२ :** पार्से येथील श्री दुर्गा इंग्लिश स्कूलने यंदाही १०० टक्के निकालाचा वारसा जपला आहे. गेल्या काही वर्षापासून या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागत असून, यंदाही ही परंपरा या विद्यालयाने जपली आहे.

रिया भिकाजी कोलकर ही विद्यार्थिनी ८५% गुण घेऊन विद्यालयात प्रथम आली. खतिजा अफसर खान ही विद्यार्थिनी ७८% गुण घेऊन विद्यालयात दुसरी आली तर विकेश सुनिल निळोजी हा विद्यार्थी ७२% गुणांनी तिसरा आला.

या उत्कृष्ट निकालाबद्दल विद्यालयाचे चेअरमन रामनाथ सावंत, व्यवस्थापक बाळकृष्ण बर्डे, मुख्याध्यापिका अनुपमा आरोलकर, पालक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्यामप्रसाद गवंडी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# गोव्यात मासळी उत्पादन वाढीसाठी केंद्रीय पातळीवर प्रयत्न

## मांद्रेत दोन ठिकाणी पैदास केंद्र : आमदार जीत आरोलकर

*टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १२ :** गोव्यातील विविध भागात १४ ठिकाणी मासळी उत्पादन वाढीसाठी खात्याने योजना चालीस लावली आहे. त्यात मांद्रेतील हरमल व केरी किनाऱ्यावर योजनाची अंमलबजावणी होईल. त्यासाठी मच्छीमार बांधवांनी योजना जाणून घ्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी व्यक्त केले.

हरमल पंचायत सभागृहात झालेल्या या बैठकीला मच्छीमार खात्याचे अधिकारी सिंग व अन्य उपस्थित होते. कित्येकदा हवामान बदलामुळे पैदास होत नाही. त्याचा फायदा आवश्यक प्रमाणात छोट्या मासेमारी व्यावसायिकांना होत नाही. त्यामुळे सिमेंट ब्लॉक्स टाकून कृत्रिम पद्धतीने समुद्रात पैदास वाढवून बाजारपेठेची मागणी पुरवली जाईल. त्यासाठी समुद्रातील भरती, ओहोटी तसेच पाच नोटिकल क्षेत्रात कार्यरत करणे तसेच त्याठिकाणी मासळी अंडी घालण्याच्या जागा, निश्चित केल्या जातील. या प्रकारात,स्थानिक मासेमारी करणाऱ्या घटकास माहिती दिली जाईल व त्यांच्या मार्गदर्शनाने ब्लॉक्स व अन्य सामग्री समुद्रात ठेवली जाईल, असे अधिकारी राजवंश सिंग यांनी सांगितले.

दरम्यान, मच्छीमार खात्यामार्फत स्थानिक व्यावसायिक सुचवीत असलेल्या जागेची पाहणी केली जाईल व त्यानंतर त्याचे कार्य सुरू करतील, असे खात्याचे अधिकारी विपुल मापारी, विनायक पेडणेकर आदींनी सांगितले. यावेळी सरपंच अनुपमा मयेकर, पंच सांतान फर्नांडिस आदी उपस्थित होते. मच्छीमार बांधव तथा माजी सरपंच इनसिओ डिसोझा, फिलपा फर्नांडिस आदींनी समस्या मांडल्या. अधिकारी सिंग यांनी आभार मानले.


**हरमल : गोवा मच्छीमार खात्यातर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार जीत आरोलकर. सोबत सरपंच अनुपमा मयेकर, पंच संतान फर्नांडिस व अधिकारी राजवंश सिंग.**